

# अभीप्सेचे स्वरूप आणि कार्य


अभीप्सा

अखिल भारतीय पत्रिका

जून २०२५

वर्ष ५०        अंक ०६



श्रीमाताजी – श्रीअरविंद

# अभीप्सेचे स्वरूप आणि कार्य


संपादकीय........................................................०२

अभीप्सेचे स्वरूप...............................................०३

प्रार्थना आणि अभीप्सा ........................................०८

अभीप्सेसंबंधी समज–गैरसमज................................२१

अभीप्सा आणि साधना.........................................३०


---

## संपादकीय

अभीप्सा, नकार आणि समर्पण ही पूर्णयोगाची त्रिसूत्री आहे. अभीप्सा म्हणजे जणू आपल्या हृदयातील गुप्त अग्नी आहे. प्रगतीचा हा असा अग्नी आहे की, जो साधकाचे शुद्धिकरण करतो, त्याला उन्नत करतो आणि प्रगतिपथावरील त्याची वाटचाल प्रशस्त करतो. अभीप्सा म्हणजे नेमके काय, साधकाच्या जीवनातील अभीप्सेचे मोल काय, अभीप्सा आणि प्रार्थना यात काय फरक आहे, या व यासारख्या अनेक प्रश्नांवर श्रीमाताजी व श्रीअरविंद यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले आहे.

'अभीप्सा' मासिकाचा हा अंक 'अभीप्सा म्हणजे ईश्वराप्रति असलेली आस' या विषयाला समर्पित आहे, हे येथे सानंद नमूद करावेसे वाटते.

संपादक, अभीप्सा मासिक

**

---


अभीप्सा मासिक हे श्रीअरविंद सोसायटी, पाँडिचेरीचे मुखपत्र आहे.


---

योगी श्रीअरविंद म्हणजे पूर्वाश्रमीचे क्रांतिकारक अरविंद घोष आणि श्रीमाताजी म्हणजे पूर्वाश्रमीच्या मीरा अल्फासा, (फ्रान्स). 'श्रीअरविंद आश्रम' हा भारताच्या पूर्व किनाऱ्यावर पाँडिचेरी येथे आहे.

# अभीप्सेचे स्वरूप

## अभीप्सा म्हणजे काय?

उच्चतर गोष्टींसाठी जिवाने केलेला धावा म्हणजे अभीप्सा! ईश्वरासाठी किंवा ईश्वरी चेतनेशी संबंधित असणाऱ्या सर्व उच्चतर गोष्टींसाठी केलेले आवाहन, त्यांना घातलेली साद, त्यासाठी केलेला धावा म्हणजे अभीप्सा.

*

आंतरिक अस्तित्वाने ईश्वराची प्रार्थना करत, त्याला अत्यंत आर्ततेने साद घालत ऊर्ध्वमुख होणे म्हणजे अभीप्सा! दिव्य सत्यासाठी, दिव्य चेतनेसाठी, शांतीसाठी, आनंदासाठी, ज्ञानासाठी, दिव्य शक्तीच्या अवतरणासाठी किंवा व्यक्तीच्या प्रयत्नांचे जे ध्येय असेल त्यासाठी आंतरिक अस्तित्वाने ऊर्ध्वमुख होणे म्हणजे अभीप्सा!

– श्रीअरविंद (CWSA 29 : 56-57)

*

अस्तित्वामध्ये सारेकाही निःशब्द आहे, परंतु या निश्चल–नीरवतेच्या हृदयामध्ये, कधीच विझू शकणार नाही असा एक दीप तेवत आहे. ईश्वराला जाणणे आणि समग्रतया ईश्वरच होऊन जीवन जगणे याबद्दल असणारी उत्कट अभीप्सा हाच जणू तो अग्नी आहे.

– श्रीमाताजी (CWM 14 : 74)

*

मनुष्यामध्ये असणाऱ्या अभीप्सेच्या बीजाला जर खऱ्या आध्यात्मिकतेचे खतपाणी दिले गेले तर तो दिव्यत्वामध्ये विकसित होईल.

– श्रीमाताजी (CWM 14 : 75)

*

## अभीप्सेचे प्रकार

आंतरात्मिक अभीप्सा सातत्यपूर्ण, नियमित, सुसंघटित, धीरयुक्त व सौम्य असते. त्याच वेळी ती सर्व प्रकारच्या विरोधाचा सामना करू

शकते आणि सर्व अडचणींवर मात करू शकते.

*

खरी अभीप्सा हे मनाचे नव्हे तर अंतरात्म्याचे स्पंदन असते.

*

मानसिक अभीप्सेची अभिव्यक्ती ही सुस्पष्ट, नेमकी आणि अगदी यथायोग्य असते.

*

आध्यात्मिक अभीप्सा ही विलंबाची किंवा कोणत्याही अडथळ्याची पर्वा न करता एखाद्या बाणाप्रमाणे वर वर जाते.

– श्रीमाताजी (CWM 14 : 76-77)

*

साधक : प्रामाणिक अभीप्सा म्हणजे नेमके काय?

श्रीमाताजी : ही अशी अभीप्सा असते की जिच्यामध्ये, हितसंबंधांमधून आलेला, स्वार्थी हिशोबीपणा नसतो.

– श्रीमाताजी (CWM 14 : 72)

*

## अभीप्सेचे मोल

(ईश्वराला दिलेली) एक साधीसुधी, सरळ व प्रामाणिक हाक आणि हृदयापासून असलेली अभीप्सा ही, कोणत्याही क्षमतांपेक्षा अधिक आवश्यक आणि अधिक प्रभावी असणारी अशी एक महत्त्वाची गोष्ट असते. आंतरिक हाक, आंतरिक अनुभूती आणि आंतरिक उपस्थिती यांच्याप्रत पोहोचण्यासाठी, चेतना बहिर्मुखी न राहता, अंतरंगामध्ये वळलेली असणे ही गोष्ट देखील अतिशय महत्त्वाची असते. तुम्ही ज्या साहाय्यासाठी प्रार्थना केली आहे ते साहाय्य तुम्हाला मिळेल. तुमच्यामध्ये अभीप्सा वृद्धिंगत होऊ दे आणि आंतरिक चेतना पूर्णपणे खुली होऊ दे.

*

व्यक्तीने फक्त प्रामाणिकपणे आस बाळगायची आणि श्रीमाताजींच्या शक्तीप्रत स्वतःला शक्य तितके खुले ठेवायचे, एवढेच व्यक्तीकडून

# प्रार्थना आणि अभीप्सा

## प्रार्थना आणि अभीप्सा यातील साम्यभेद

(सर्वसामान्यपणे लोकांना प्रार्थना माहीत असते पण श्रीअरविंद व श्रीमाताजी प्रणीत पूर्णयोगामध्ये ज्या अभीप्सेला अतिशय महत्त्व आहे ती 'अभीप्सा' म्हणजे काय हे सहसा माहीत नसते. कधीकधी प्रार्थना म्हणजेच अभीप्सा अशी एक समजूत आढळते. परंतु या दोन्हीचा संबंध कसा व किती आहे आणि या दोन्हीच्या स्वरूपात नेमका काय फरक आहे असा प्रश्न एका साधकाने विचारला आहे. त्यावर श्रीमाताजींनी दिलेले हे उत्तर...)

श्रीमाताजी : प्रार्थनेचे अनेक प्रकार आहेत. काही प्रार्थना अगदी यांत्रिक, भौतिक प्रार्थना असतात; यामध्ये पाठ केलेल्या शब्दांचे अगदी यांत्रिकपणे आवर्तन केले जाते. त्यातून फारसे काही साध्य होत नाही. त्यांचा सहसा केवळ एकच परिणाम घडून येतो, तो म्हणजे, जी व्यक्ती प्रार्थना करत असते तिच्या अंतःकरणातील खळबळ शांत होण्यास मदत होते; जर प्रार्थनेचे पुन्हा पुन्हा आवर्तन केले तर त्या शब्दांमुळे व्यक्तीला स्थिरता लाभते. व्यक्तीला जे काही हवे असते त्याची नेमकेपणाने अभिव्यक्ती ज्यामध्ये असते अशा काही उत्स्फूर्त प्रार्थना देखील असतात. व्यक्ती या किंवा त्या गोष्टीची मागणी करण्यासाठी, या ना त्या गोष्टीसाठी प्रार्थना करत असते. किंवा कधी ती दुसऱ्या एखाद्या व्यक्तीसाठी प्रार्थना करत असते किंवा कधी एखाद्या परिस्थितीसाठी तर कधी स्वत:साठी देखील व्यक्ती प्रार्थना करत असते.

कधीकधी मात्र असा एखादा क्षण असतो की, जेथे प्रार्थना आणि अभीप्सा यामध्ये काही भेद शिल्लक राहिलेला नसतो. कारण अशा काही प्रार्थना असतात की, ज्या व्यक्तीला आलेल्या जिवंत अनुभूतींचा उत्स्फूर्त उद्गार असतात. व्यक्तीच्या अंत:करणातून अगदी पूर्णपणे तयार होऊनच, त्या प्रार्थना उदित होतात; आलेल्या अनुभूतींबद्दल त्या कृतज्ञता व्यक्त

नमस्कार वाचकहो,

अभीप्सा मासिकातील काही पाने आपल्या अवलोकनार्थ येथे देण्यात आली होती. आपल्याला ह्या अंकातील विषयावरील आणि यासारख्या इतर विषयांवरील श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांचे विचार मराठीत समजून घ्यावयाचे असतील तर, आपण अभीप्सा मासिकाचे वर्गणीदार व्हावे, ही विनंती.

वर्गणीचा तपशील शेजारील पानावर दिला आहे.

– संपादक, अभीप्सा मासिक

## मासिकाचे स्वरूप

श्रीअरविंदांचे बहुतांशी सारे साहित्य मुळात इंग्रजी व बंगाली भाषेत आहे. तर श्रीमाताजी यांचे बहुतांशी वाङ्मय फ्रेंच व इंग्रजी भाषेत आहे. हे दुर्मिळ विचारधन मराठीत आणण्याचे प्रयत्न 'अभीप्सा' या मासिकाच्या माध्यमातून अव्याहतपणे चालू आहेत. पाँडिचेरीहून प्रकाशित होणाऱ्या श्रीअरविंद सोसायटीचे मुखपत्र असलेल्या 'ऑल इंडिया मॅगेझिन' या इंग्रजी मासिकाची मराठी आवृत्ती म्हणजे 'अभीप्सा.' १९७५ पासून हे मासिक नियमितपणे प्रकाशित होत आहे.

### वर्गणी व देणगीचा तपशील

वार्षिक वर्गणी : २०० रू. (१२ अंक)
तीन वर्षाचे दर : ५८० रू. (३६ अंक)
पाच वर्षांचे दर : ९६० रू. (६० अंक)
देणगीदार : ४००० रू.
(देणग्या 80 G अंतर्गत करसवलतीस पात्र आहेत.)

वर्गणी वा देणगीची रक्कम आपण ऑनलाईनदेखील भरू शकता.

### वर्गणी वा देणगी ऑनलाईन भरण्यासाठी बँकेचा तपशील

खातेदाराचे नाव : Sri Aurobindo Society
बँकेचे नाव : Central Bank of India
IFSC Code : CBIN0281354
A/C No. : 1235467709

*

**सूचना :** रक्कम भरल्याची पोहोचपावती व आपला संपूर्ण पत्ता membership@aurosociety.org आणि editorabhipsa2018@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवावा ही विनंती; म्हणजे आपल्या पत्त्यावर अंक पाठवता येईल.

*

वर्गणीदारांना काही कारणाने अंक उपलब्ध न झाल्यास पुढील क्रमांकावर संपर्क करावा – श्री. गोविंद पोतदार ९३७३७२४५२०

# अखंड भारताची अभीप्सा

तो दिवस होता १६ सप्टेंबर १९६५. भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये युद्ध पेटलेले होते.

एका संभाषणाच्या दरम्यान श्रीमाताजी एका निकटवर्ती साधिकेला म्हणाल्या, ''भारत आणि पाकिस्तान पुन्हा एकसंध झाले पाहिजेत. मी पंतप्रधान शास्त्री यांना जो संदेश पाठविला आहे तो तू वाचलास का?'' तो संदेश असा होता की, ''भारत सत्यासाठी आणि सत्याच्या विजयासाठी लढत आहे. भारत आणि पाकिस्तान पुन्हा एकसंध होत नाहीत तोपर्यंत, भारताने लढा देत राहणे आवश्यक आहे; कारण एकसंध होणे हे त्यांच्या अस्तित्वाचे सत्य आहे.''

त्या साधिकेने विचारले, ''श्रीअरविंदांचे या युद्धाबाबत काय म्हणणे आहे?''

श्रीमाताजी म्हणाल्या, ''हा संदेश त्यांनीच दिला आहे, असे समज. त्यांना हेच अपेक्षित आहे.''

त्या साधिकेने पुन्हा विचारले, ''पण माताजी, सुरक्षा-परिषदेने जर युद्धविरामाची आज्ञा दिली तर... तर काय होईल?''

श्रीमाताजी ठामपणे उद्गारल्या, ''नाही. भारताने लढा देत राहिले पाहिजे. अन्यथा भारताला पुन्हा पहिल्यापासून सुरुवात करावी लागेल.''

आणि आता आज... साल २०२५

भारतीयांना हे ज्ञात आहे की, १९६५ साली ताश्कंद करारामुळे युद्धविराम झाला खरा पण... पण श्रीमाताजी म्हणाल्या होत्या त्याप्रमाणे, भारताला पुन्हा पुन्हा पाकिस्तानच्या विरोधात लढा द्यावा लागत आहे.

श्रीमाताजी व श्रीअरविंदांच्या अंतःकरणातील 'अखंड भारताची अभीप्सा' आजही पाँडिचेरी येथील श्रीअरविंद आश्रमामध्ये धगधगती आहे. आश्रमाच्या मैदानामधील अखंड भारताचा नकाशा आजही त्याची साक्ष देत उभा आहे. या अभीप्सा-अग्नीमध्ये कोटीकोटी भारतीयांच्या अभीप्सेच्या ज्वाला मिसळल्या गेल्या तर ईश्वरी शक्तीकडून त्यास प्रतिसाद मिळण्यास वेळ लागणार नाही, हे निश्चित!!

– आधारित (Mother you said so : 91-92)

❖

## आजवर दर्शनदिनी देण्यात आलेले संदेश (क्रमश:)

### २८ फेब्रुवारी २००६

(२९ फेब्रुवारी १९५६ च्या संध्याकाळी श्रीमाताजींनी आश्रमाच्या मैदानावर श्रीअरविंद लिखित Synthesis of Yoga या ग्रंथामधील एक उतारा वाचून दाखविला. त्यावरील प्रश्नोत्तरांनंतर सारे ध्यानस्थ झाले.)

ध्यानामध्ये जे घडले त्याविषयी श्रीमाताजींनी सांगितले की, ''आत्ता या संध्याकाळी दिव्य अस्तित्व अगदी सघन, मूर्त स्वरूपामध्ये तुमच्यामध्ये उपस्थित होते. मी जणू सजीव असा सुवर्णाकार धारण केला होता आणि या विश्वापेक्षा विशाल झाले होते. मी एका भल्या मोठ्या प्रचंड सुवर्णदरवाज्यासमोर उभी होते. त्या दरवाजाने जगाला 'ईश्वरा'पासून अलग केले होते. मी त्या दरवाजाकडे पाहिले आणि निमिषार्धात मला जाणवले, 'वेळ आली आहे.'

मी दोन्ही हातांनी एक भला मोठा सुवर्ण हातोडा उचलला आणि जोरात त्या दरवाजावर मारला आणि एका झटक्यात त्या दरवाजाचे तुकडेतुकडे झाले. तेव्हापासून अतिमानसाचा प्रकाश, त्याची शक्ती, त्याची चेतना यांचा लोंढा या पृथ्वीवर अखंडितपणे वाहू लागला आहे.''

– श्रीमाताजी (CWM 15 : 188)

*